प्रथम सत्र परीक्षा

विषय - मराठी

इयत्ता 12 वी गुण 50

( विभाग - 1 गद्य 8 गुण )

कृती 1 ) पुढील गद्य उतारा वाचा आणि दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. ( 8 गुण )

अ ) 1. श्रावण महिन्यातील सण .......... (1 गुण )

2. लेखिकेच्या मिशन चे नाव ......... (1 गुण )

आ ) उताऱ्यातील राखी पौर्णिमेचे महत्व ....... (2 गुण )

ऑगस्ट महिन्यात श्रावण असतो आणि श्रावण म्हणजे 'राखी पौर्णिमा! सगळ्यांचा आवडता सण. त्या राखीच्या मी एका धाग्यानं बहीण-भावाचं नातं कायमचं घट्ट राहातं. बहिणीच्या भावावरील निरपेक्ष प्रेमाची आणि भावावरील तिच्या रक्षणाच्या जबाबदारीची ही भावनिक वीण. मग आपल्या रक्षणकर्त्याला प्रत्यक्ष भेटून राखी बांधली, आशीर्वाद दिले, तर आपली कृतज्ञता व्यक्त होईल आणि राखीचा सन्मान होईल. आमचं एकमत झालं आणि रक्षाबंधनाचा मुहूर्त साधून लोकांना घेऊन कारगिलला जायचं हे निश्चित ठरवलं. चोवीसजण आमच्याबरोबर यायला तयार झाले आणि सुरू झालं 'मिशन लडाख' सैनिकांच्या रेजिमेंटमध्ये जायचं, सैनिकांना भेटायचं; म्हणजे जणू सिंहाच्या गुहेत प्रवेश मिळवायचा होता. बऱ्याच खटपटी करून आम्हांला निघण्यापूर्वी १४ कोअरच्या लेहमधील हेडक्वार्टरमधून प्रतिसाद आला. आम्हांला १४ कोअरच्या कर्नल झा यांनी बोलावलं होतं.

इ) सैनिकी जीवन आणि सामान्य नागरिकांचे जीवन यांची तुलना तुमच्या शब्दात करा. (4 गुण )

( विभाग 2 पद्य 6 गुण )

कृती 2 ) पुढील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. ( 6 गुण )

1. अतिभयंकर असलेली ........... ( 1 गुण )

2. फुणफुण शांत करणारे ........... ( 1 गुण )

विंचू चावला वृश्चिक चावला |

कामक्रोध विंचू चावला |

तम घाम अंगाशी आला || धु ||

पंचप्राण व्याकुळ झाला |

त्याने माझा प्राणी चालिला |

सर्वांगाचा दाह झाला || 1||

मनुष्य इंगळी अति दारुण |

मज नांगा मारीला तिने |

सर्वांगी वेदना जाण |

त्या इंगळीची ||2||

ह्या विंचवाला उतारा |

तमोगुण मागे सारा |

सत्वगुण लावा अंगारा |

विंचू इंगळी उतरे झरझरा ||3||

सत्त्व उतारा देऊन |

अवघा सारीला तमोगुण |

किंचित राहिली फुणफुण |

शांत केली जनार्दनें || 4||

3) विंचू चावला.... ह्या भारूडाचे रसग्रहण करा. ( 4 गुण )

किंवा

विंचू चावला ....... ह्या भारुडाचे काव्य सौंदर्य स्पष्ट करा.

(विभाग 3- साहित्यप्रकार कथा 6गुण )

कृती 3 ) पठित कथा - 'शोध'

पुढीलपैकी कोणत्या दोन कृती सोडवा.    (6 गुण )

1. 'शोध' या कथेत एक रुपयाच्या नोटे व्यतिरिक्त आणखी कोणकोणते शोध तुम्हाला महत्वाचे वाटतात ,ते स्पष्ट करा.

2.' शोध ' या कथेतील टॅक्सी ड्रायव्हर हे पात्र तुम्हाला आवडण्याचे किंवा न आवडण्याचे कारण स्पष्ट करा.

3. कथेच्या ' शोध ' या शीर्षकाची समर्पकता स्पष्ट करा.

4. कथेच्या नायिकेचे स्वभाव चित्र तुमच्या शब्दात रेखाटा.

विभाग 4 - उपयोजित मराठी ( 10गुण )

कृती क्र 4) दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (कोणतेही दोन) ( 10 गुण)

1) परिचारकेची मुलाखत घेण्यासाठी मुलाखत पूर्व प्रश्नावली तयार करा.

2) मुलाखतीची पूर्वतयारी कशी करावी ते खालील मुद्द्यांच्या आधारे लिहा.

अ) मुलाखतदात्याची वैयक्तिक माहिती

आ) मुलाखतदात्याचे कार्य

इ) मुलाखतीच्या अनुषंगाने वाचन

3) महाराष्ट्रीयन पद्धतीचे सुग्रास भोजन उपलब्ध करून देणाऱ्या भोजनागृहाचे माहितीपत्रक तयार करण्यासाठी कोणकोणते मुद्दे आवश्यक राहतील ते लिहा.

4) एका वस्त्रदालनाचे आकर्षक माहिती पत्रक तयार करा.

विभाग 5 - व्याकरण व लेखन (20 गुण)

कृती 5 अ ) व्याकरण (गुण 10)

1. कंसातील सूचनेप्रमाणे वाक्यरूपांतर करा.

१) ही काही वाईट कल्पना नाही. ( होकारार्थी वाक्य करा)

२) पांढरा रंग सर्वांना आवडतो. ( प्रश्नार्थी वाक्य करा)

2. विग्रहा वरून सामासिक शब्द तयार करा.

१) दहा दिशांचा समूह

२) मान हेच धन

3. खालील वाक्यातील प्रयोग ओळखा.

१) समीर चित्र रंगवतो.

२) कमलने बक्षीस मिळवले.

4. अलंकार ओळखा.

१) मुंगी उडाली आकाशी

तिने गिळले सुर्यासी !

२) सागरासारखा गंभीर सागरच !

5. वाक्यप्रचाराचा अर्थ ओळखा.

१) डोळा लागणे -

( मन शांत होणे ,स्वप्न पडणे , झोप येणे , भीती वाटणे)

२) कवने गाणे -

( निंदा करणे , स्तुती करणे , त्रास देणे , गीत गाणे)

कृती 5 आ) लेखन (10 गुण)

आ) यापैकी कोणत्याही एका विषयावर २५० ते ३००शब्दात निबंध लिहा.

१) पहाटेचे सौंदर्य

२) माझा आवडता कलावंत

3) वृत्तपत्राचे मनोगत

४) पेट्रोल संपले तर

५) तंत्रज्ञानाची किमया